

जनाई-शिरसाई' योजनेच्या बंदिस्त पाईपलाईनसाठी 438 कोटी

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत** वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 12/02/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 48 ‖ RNI - MAHMAR/2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द करा : मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : दहावी व बारावीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांच्याशी परीक्षेच्या तयारीबाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री उपस्थित होते.

इयत्ता बारावीची परीक्षा ११ ते पासून १८ मार्चपर्यंत ३,३७३ परीक्षा केंद्रावर होणार आहे.

दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च कालावधीत ५,१३० परीक्षा केंद्रावर होणार आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण केली असल्याचे माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 163 ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णतः प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देतांना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगणार नाहीत याची खबरदारी घ्यावी , भरारी पथकाद्वारे कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित आहे, अशा सूचना दिल्या.

परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडणे ही जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संयुक्त जबाबदारी राहील. शहरी भागात पोलीस आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांची जबाबदारी राहील, त्यानुसार कामकाज करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. इंग्रजी भाषा, गणित व विज्ञान विषयांच्या परीक्षेच्या दिवशी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवेदनशील केंद्रांना स्वतः भेटी द्याव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले.

# महात्मा फुले वाडा स्मारकाच्या आरक्षित जागेचे होणार भूसंपादन !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी आरक्षित जागेचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यास स्थायी समितीच्या बैठकीत नुकतीच मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामध्ये जागा जाणाऱ्या मालकांना नुकसानभरपाई दिली जाणार आहे. भूसंपादनासाठी ४० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे.**

गेल्या आठवड्यात महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी नगरविकास मंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली आहे. या भागातील जागा ताब्यात घेऊन तेथे स्मारक उभारले जाणार आहे. यासाठी आजूबाजूची जागा ताब्यात घेऊन आरक्षित केली जाणार आहे. राज्य सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.



राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात याबाबत तरतूद केली जाणार आहे. या स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेल्या जागेचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची सूचना महापालिकेला करण्यात आली होती. त्यानंतर महापालिकेने या भागातील जागा ताब्यात घेत ही जागा आरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे.

यामध्ये एकूण ९१ मिळकती ताब्यात घेण्यात येणर असून, ५ हजार ३१० चौरस मीटर जागा ताब्यात घ्यावी लागणार आहे. यामध्ये ५१६ मालकांची संख्या असून भाडेकरूंची संख्या २८५ इतकी आहे. यासाठी ४० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता लागणार आहे. महात्मा फुले वाडा आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकांच्या विस्तारीकरणासाठी येथील जागेचे भूसंपादन करून रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

त्यानंतर फुले वाडा आणि सावित्रीबाई फुले स्मारक या दोन्ही स्मारकांना जोडण्यासाठी रस्ता करण्यात येणार आहे. त्याचबरोबर दोन्ही स्मारकांचे जतन आणि विकास करण्यात येणार आहे. यासाठी २०० कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारने मान्य केला असून, प्रशासकीय मान्यतेनंतर हा मंजूर निधी महापालिकेला वितरीत केला जाणार आहे.

# चिखली येथील कुदळवाडी येथे बांधकाम निष्कासनाची कारवाई



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : चिखली येथील कुदळवाडी भागात ९६ एकर भूभागावरील सुमारे ४१ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ८०६ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. सलग चौथ्या दिवशी सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांचा समावेश होता.**

शहरातील नियोजित विकास आरक्षणे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी असलेल्या जागेवरील अतिक्रमण हटविण्यासाठी बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि धडक कारवाई पथकांमार्फत कुदळवाडी येथे ८ फेब्रुवारी २०२५ पासून अनधिकृत बांधकाम निष्कासनाची कारवाई करण्यात येत असून आज कारवाईचा चौथा दिवस होता.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचेता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, महेश वाघमोडे, अजिंक्य येळे, शितल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले आहेत. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, संदीप डोईफोडे, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या कारवाईमध्ये सहभागी यंत्रणा

अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी या कारवाईमध्ये सहभागी झाले होते. १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या आहेत. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते. आज अखेरपर्यंत सुमारे २ हजार ३१७ बांधकामांवर करण्यात आली निष्कासनाची कारवाई

महापालिकेच्या वतीने कुदळवाडी येथे सुरू असलेल्या या निष्कासनाच्या कारवाईमध्ये आज अखेरपर्यंत सुमारे १६१ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या एकूण २ हजार ३१७ बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच सुमारे ३७२ एकर भूभागावर ही कारवाई करण्यात आली असून यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार आहे.

# शहरात कॉपीमुक्त अभियान प्रभावी पणे राबविणार - आयुक्त शेखर सिंह



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : कॉपीमुक्त अभियान सन फेब्रुवारी 2025 च्या अनुषगाने महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्या शंभर दिवसाच्या कृती आराखड्या अंतर्गत व माननीय शिक्षण मंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता बारावी व दहावीच्या बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पाडाव्यात असे निर्देश देण्यात आलेले आहेत.**

या निर्देशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन व शिक्षण मंडळ यांच्याकडून काही महत्त्वाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

या सुचनांनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने मनपा हद्दीतील परीक्षा केंद्रांवर माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी मा. सहाय्यक आयुक्त, माध्यमिक शिक्षण विभाग व मा. शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग यांचे नियंत्रणाखाली पाच भरारी पथकाची नेमणुक करण्यात आलेली आहे. सदर भरारी पथकांमार्फत मनपा हद्दीतील संवेदनशील व असंवेदनशील परीक्षा केंद्रांवर प्रत्यक्ष भेटी देऊन काही गैरप्रकार होऊ नये यांची दक्षता घेतली जाणार आहे.

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये एकुण एच.एस.सी बोर्ड परीक्षेकरीता एकुण ३३ परीक्षाकेंद्रे असुन २५७०० विदयार्थी व एस.एस.सी बोर्ड परीक्षेकरीता एकुण ४८ परीक्षाकेंद्रे असुन २८५०० विदयार्थी प्रविष्ठ झालेले आहेत.

तसेच पिंपरी चिंचवड मनपा अंतर्गत कार्यरत असणाऱ्या १८ माध्यमिक विद्यालयातील मराठी माध्यमाचे २३०० विदयार्थी व उर्दू माध्यमाचे ५०० असे एकुण २८०० विदयार्थी एस.एस.सी बोर्ड परीक्षेकरीता प्रविष्ठ झालेले आहेत.

सर्व परीक्षा केंद्रांच्या केंद्राध्यक्षांना प्रत्येक परीक्षा हॉलमध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्यासंदर्भात सुचना देण्यात आलेल्या आहेत.

ज्या केंद्रावरती गैरप्रकार घडतील किंवा गैरप्रकाराला उद्युक्त करणारे तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष गैरमार्गाचा वापर करणाऱ्यांवर महाराष्ट्र Prevention of malpractices act. 1982 अंतर्गत दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

# जनाई-शिरसाई' योजनेच्या बंदिस्त पाईपलाईनसाठी 438 कोटी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई, पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती व पुरंदर तालुक्यातील अवर्षणग्रस्त भागासाठी लाभदायी असणाऱ्या जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीत रूपांतरित करण्यासाठी 438 कोटी 48 लाख रुपयांच्या कामाला आज मंत्रिमंडळाने प्रशासकीय मान्यता दिली. या योजनेमुळे दौंड, बारामती व पुरंदर तालुक्यातील एकूण 14 हजार 80 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या योजनेसाठी ही मान्यता मिळाली आहे.**



जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतरण करण्याच्या कामासाठी मंत्रीमंडळाच्या बैठकीत विस्तार व सुधारणा अंतर्गत 438 कोटी 48 लाख रुपयांच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या योजनेअंतर्गत नवीन मुठा उजव्या कालव्याद्वारे 94 किमी अंतरावर वरवंड तलावात पाणी सोडले जाते. तेथून उपसा करून 8 हजार 350 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. या योजनेत एकूण 18 तलाव समाविष्ट असून, सध्या 13 तलाव पाण्याने भरले जात आहेत.

शिरसाई उपसा सिंचन योजनेंतर्गत नवीन मुठा उजव्या कालव्याद्वारे 138 किमी अंतरावर शिर्सुफळ तलावात पाणी सोडले जाते. तेथून उपसा करून 5 हजार 730 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या योजनेत 47 तलावांचा समावेश आहे, त्यापैकी 32 तलाव पाण्याने भरले जात आहेत. नलिका प्रणालीमुळे भूसंपादनाची गरज राहत नाही. तसेच मशागतीस कोणताही अडथळा येत नाही. नलिका वितरणाद्वारे समन्यायी पाण्याचे वाटप करणे सुलभ होते. नलिका वितरण प्रणालीचा देखभाल दुरुस्ती व परिचलनाचा खर्चही तुलनेने कमी राहतो. डोंगर उतारावरील, खोल खोदाईतील व काळ्या मातीतील कालव्यांवर तुलनेने देखभाल-दुरूस्तीचा खर्च जास्त राहतो. खडकवासला प्रकल्पातून सदर योजनेस पाणी मिळते तरी सदर योजना बंदिस्त नलिकेमध्ये रूपांतरीत केल्याने पाण्याचा कार्यक्षम वापर होणार आहे. तसेच पाण्याची बचत होऊन पुणे महानगरपालिकेला पाणी पुरवठ्यामुळे खडकवासला प्रकल्पावरील येणारा ताण कमी होणार आहे.

दौंड, बारामती व पुरंदर तालुक्यातील आवर्षणग्रस्त भागातील शेतीला पाणी मिळण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे मंत्रीमंडळाने या कामासाठी प्रशासकीय मान्यता दिली आहे, ही योजना तिन्ही तालुक्यातील 14 हजार 80 हेक्टर अवर्षणग्रस्त क्षेत्रासाठी वरदान ठरणार आहे.

# टाकाऊ वस्तूंपासून कलाकृती उभारत सार्वजनिक जागा 'कचरामुक्त'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : मोकळ्या जागेवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अनोखा उपाय केला आहे.

या कर्मचाऱ्यांनी चिंचवड परिसरातील कावळे वखार मोहननगर येथील सार्वजनिक जागेवर खराब झालेले झाडू, बांबूच्या काठ्या तसेच इतर टाकाऊ वस्तूंचा अतिशय कल्पकतेने वापर करून सुंदर कलाकृती उभारली आहे. आर्ट टू वेस्ट ही संकल्पना राबवल्यामुळे हा परिसर कचरामुक्त झाला आहे. शिवाय याठिकाणी आता सेल्फी काढण्याचा आनंदही नागरिक घेऊ लागले आहेत.



कल्पकतेला नाविन्यतेची जोड देऊन एखादी सार्वजनिक जागा कचरामुक्त करून अधिक सुंदर बनवण्याची कमाल महानगरपालिकेच्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी करून दाखवली आहे. चिंचवड परिसरातील कावळे वखार मोहननगर येथे असणाऱ्या मोकळ्या जागेवर परिसरातील नागरिकांकडून कचरा टाकला जात होता. येथे कचरा टाकू नये, असे वारंवार आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात येत होते. परंतु त्यानंतरही कचरा टाकण्याचा प्रकार सुरू असल्याने हा परिसर अस्वच्छ झाला होता.

अखेर येथील समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अनोखा उपाय केला आहे.

आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या ठिकाणी स्वच्छता करून खराब झाडू, बांबूच्या काठ्या, इतर टाकाऊ वस्तू यांचा कल्पकतेने वापर करून सुंदर व सुबक कलाकृती तयार केली. त्यामुळे येथील कचऱ्याची समस्या दूर तर झाली आहेच, शिवाय येथील स्थानिक नागरिक ही जागा स्वच्छ राहील, यासाठी काळजी घेऊ लागले आहेत. ही जागा कचरामुक्त करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होऊ लागले आहे.

ही जागा कचरामुक्त करून तेथे टाकाऊ वस्तूंपासून कलाकृती तयार करून उभारण्यासाठी महापालिका 'अ' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे व प्रभाग क्रमांक १४ चे आरोग्य निरीक्षक विकास शिंदे महापालिका अधिकारी, कर्मचारी आदींनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 12/02/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भक्तिमय वातावरणात विश्वकर्मा जयंती साजरी

## प्रभू विश्वकर्मा यांच्या प्रतिमेची रथयात्रेतून मिरवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



निगडी (प्रतिनिधी) विश्वकर्मीय समाज पिं-चिं शहर सामाजिक संस्था समाजाच्या वतीने

संपूर्ण सृष्टीचे सृजन कर्ता म्हणजेच विश्वाचे पहिले शिल्पकार व वास्तुकार प्रभू विश्वकर्मा यांच्या प्रतिमेची रथयात्रा मिरवणूक काढून भक्तिमय वातावरणात विश्वकर्मा जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी सुतार, लोहार, सोनार, शिल्पकार, तांबट या विश्वकर्मीय समाजाचे प्रतीक असलेल्या पंचरंगी ध्वज उंचावत मिरवणुक आकुर्डी खंडोबा मंदीर चौक येथे प्रभू विश्वकर्मा यांच्या मूर्तीचे आरती व पूजन श्री खंडोबा मंदिर देवस्थानच्या मैदानात करण्यात आली.

यावेळी खंडोबा देवस्थान ट्रस्ट आकुर्डी अध्यक्ष विठ्ठल काळभोर व विश्वस्त ज्ञानेश्वर कुटे, तुकाराम बागल तसेच, उत्तम केंदळे नगरसेवक पिं चि महानगरपालिका, संतोष जाधव नगरसेवक पिं चि महानगरपालिका, संजीवन सांगळे, उद्योजक इरप्पा पांचाळ, सत्यभाई त्रिपाठी, मारुती परीट, विलास भालेराव, ग्रंथमित्र रमेशराव सुतार, डॉ कृष्णकांत मानकर, अनिता पांचाळ, संतोष भागवत, भारती मानमोडे व ह.भ.प. सचिन महाराज जाधव, मुख्य समन्वयक विद्यानंद मानकर यांच्या हस्ते झाले.

प्रभू विश्वकर्मा भव्य रथयात्रा व मिरवणूक खंडोबा माळ आकुर्डी वरून निगडी मार्गे विश्वकर्मा मंदिर यमुनानगर निगडी येथे मार्गस्थ झाली. या भव्य दिव्य रथयात्रा व मिरवणुकीमध्ये वारकरी संप्रदायांमधील परंपरा जपण्यासाठी विश्वगुरु वारकरी संस्था आळंदी येथील 150 वारकरी विद्यार्थी व विद्यार्थिनी टाळ आणि मृदुंगाच्या नादामध्ये प्रभू विश्वकर्मा यांच्या नामाचा जयघोष करत या मिरवणुकीत सहभागी झाले होते. रथाला आकर्षक विद्युत रोषणाई लहू सुतार यांनी तर सजावट भरत गायकवाड, विठ्ठल गरुड यांनी केली. आलेल्या पुरुष व महिला भाविक व भक्तांचे स्वागत विठ्ठल सुतार यांनी भगवे फेटे बांधून केले.

रथयात्रेदरम्यान सामाजिक प्रबोधन करण्याच्या दृष्टीने आरोग्य, शिक्षण व आर्थिक सक्षमीकरणाच्या प्रबोधन केले. बरोबरच दिनांक १६ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाने निर्माण केलेल्या "संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळाला" त्वरित आवश्यक निधी प्राप्त करून देण्यात यावा. अशी मागणी कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक विद्यानंद मानकर यांनी यावेळी केली. सर्व विश्वकर्मीय माता भगिनी व बांधव यांचे सामाजिक सलोखा व बंधुता अबाधित राहण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील ओतारी, साळी, नाथपंथी भराडी, वीरशैव लिंगायत, नामदेव शिंपी, नाभिक समाज सहभागी झाले होते. अन्य समाजाच्या वतीने देखील रथयात्रेचे भव्य स्वागत करण्यात येऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.

या मिरवणुकीला आमदार महेश लांडगे यांनी सर्वोपतरी मदत करून सहकार्य केले. पुणे जिल्ह्याच्या परिसरातील म्हणजेच, खेड आंबेगाव जुन्नर मावळ मुळशी लोणावळा या परिसरामधील समाज बांधव माता भगिनी ह्या भव्य रथयात्रा मिरवणुकीला उपस्थित राहिले. भव्य रथयात्रा व मिरवणुकीची सांगता विश्वकर्मा मंदिर सेवाभावी ट्रस्ट यमुनानगर निगडी येथील मंदिरात होऊन सर्व भाविक व भक्त यांनी महाआरती व महाप्रसादाचा लाभ घेतला. मिरवणूक व रथ यात्रेचे आयोजन विद्यानंद मानकर, भगवान श्राद्धे, बाळासाहेब करडके, विठ्ठल गरुड, दत्तात्रय कदम, अनिता पांचाळ, रेशमा केदारी, ज्ञानेश्वर सुतार, सतिश सुतार, विवेकानंद सुतार, सचिन सुतार, चंद्रकांत गायकवाड, तात्यासाहेब पांचाळ, रामलिंग सुतार, राजेंद्र चौधरी, संजय सुतार, श्रीपाद सुतार, प्रकाश बापरडेकर, गणेश भोपे, विजय मानमोडे, मंगेश कदम, विशाल गाडेकर, आशुतोष सुतार, बबन केदार, भिकाजी आहेर, जालिंदर दिवेकर, संजीव सुतार, प्रकाश सूर्यवंशी, सागर पवार, सोहम मानकर, रवींद्र जाधव, गणेश सूर्यवंशी, सुनील बोरसे यांनी सकल विश्वकर्मीय समाजाच्या वतीने करण्यात आले. भव्य रथयात्रा व मिरवणुकीचे सूत्रसंचालन किशोर कदम व आभार विद्यानंद मानकर यांनी केले.

# वाहन मालकांना अटकावून ठेवलेली वाहने सोडवून घेण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे, पिंपरी-चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाने थकीत कर वसुलीसाठी मोटार वाहन कायद्यातील गुन्ह्यांतर्गत कार्यालयाच्या आवारात वाहन मालक किंवा चालक यांच्या जबाबदारीवर अटकावून ठेवलेली वाहने वाहन मालकांनी तडजोड शुल्क, मोटार वाहन कर, पर्यावरण कर भरुन वाहने येत्या १५ दिवसांत सोडवून घ्यावी.

या कार्यालयाने मोटार वाहन थकीत कराच्या वसुलीसाठी अटकावून ठेवलेल्या वाहनांच्या जाहीर लिलावाची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. त्यापैकीच 19 वाहनांच्या प्रकरणांमध्ये कार्यालयाशी संपर्क केलेला नाही तसेच वाहन सोडवून घेण्याबाबत हक्कही सांगितलेला नाही.

अशा वाहनांची यादी या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित केलेली आहे. ही वाहने बेवारस वाहने असल्याचे समजून सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगीने अशा वाहनांचा जाहीर लिलाव करण्यात येईल.

अधिक माहितीकरीता प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, संत नगर, मोशी प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड ०२०-२७२३२८२८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच www.mstcindia.co.in किंवा www.eacution.gov.in या संकेतस्थळाला भेट देवून माहिती घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक अधिकारी राहूल जाधव यांनी केले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# समाजाच्या सात्त्विकतेसाठी शुद्ध आचारविचारांची गरज! - डॉ.श्रीपाल सबनीस

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : 'समाजाच्या सात्त्विकतेसाठी शुद्ध आचारविचारांची गरज असते!' असे विचार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी प्रीतम प्रकाश महाविद्यालय, इंद्रायणीनगर, भोसरी येथे मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी व्यक्त केले. पाली - मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान, पिंपरी आयोजित वार्षिक शब्दोत्सव उपक्रमांतर्गत जीवनगौरव व अन्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. टाटा मोटर्सचे सेवानिवृत्त महाव्यवस्थापक मनोहर पारळकर, नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी अध्यक्ष कृषिभूषण सुदाम भोरे, प्राचार्य सदाशिव कांबळे, लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रीतम प्रकाश महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव सन्मान प्रदान करून गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र, मानवस्त्र, पुष्पगुच्छ आणि 'समग्र बाबा भारती' हा ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरूप होते. त्याचबरोबर ज्येष्ठ पत्रकार पीतांबर लोहार (लोकशिक्षक बाबा भारती पारदर्शक पत्रकारिता पुरस्कार), संविधान अभ्यासक आर. जी. गायकवाड (लोकशिक्षक बाबा भारती धम्मभूषण पुरस्कार), निवेदक प्रा. दिगंबर ढोकले (लोकशिक्षक बाबा भारती शब्दप्रतिभा पुरस्कार), कवयित्री सीमा गांधी आणि प्रतिमा काळे (लोकशिक्षक बाबा भारती काव्यप्रतिभा पुरस्कार) प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, 'चांगुलपणाची बेरीज म्हणजे भारतीय संस्कृती आहे; तर स्वातंत्र्योत्तर संविधान संस्कृतीच्या सक्षमीकरणासाठी जात आणि धर्माच्या पलीकडे जाऊन कार्य केले पाहिजे. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान असे सामाजिक अभिसरणाचे काम करते आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. बौद्ध विचारांचा भारत आणि भारताबाहेर प्रचार अन् प्रसार करताना बाबा भारती यांनी बहुसांस्कृतिक भूमिका स्वीकारली होती!' मनोहर पारळकर यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

मुख्य संयोजक पुरुषोत्तम सदाफुले यांनी पुरस्कारार्थींशी सुसंवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. पीतांबर लोहार यांनी बोलीभाषेतील 'माय' आणि 'राम प्रहरात' या कवितांचे सादरीकरण केले. लता पगारिया यांनी प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया यांच्या सहजीवनाची वाटचाल काव्यमय शैलीतून कथन केली. सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. पगारिया यांनी, 'लोकशिक्षक बाबा भारती यांच्या नावाचा पुरस्कार हे मोठे भाग्य आहे. जीवनगौरव हा अधिक सेवाप्रवृत्त करणारा सन्मान आहे!' अशी भावना व्यक्त केली. वृक्षपूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. प्राचार्य सदाशिव कांबळे यांनी स्वागत केले. महेंद्र भारती यांनी प्रास्ताविकातून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या व्यक्तींना प्रतिष्ठानच्या माध्यमातून सन्मानित करण्यात आले आहे, अशी माहिती दिली.

प्रभाकर वाघोले, रवींद्र भारती, जयश्री श्रीखंडे, बाजीराव सातपुते, निमिष भारती, प्रदीप गांधलीकर तसेच प्रीतम प्रकाश महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारीवर्ग यांनी संयोजनात सहकार्य केले. सीमा गांधी यांनी सूत्रसंचालन केले. अरुण गराडे यांनी आभार मानले.

# सलग तीन वर्षे नियमित कर भरल्यास चौथ्या वर्षी सवलत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : 'समाजाच्या सात्त्विकतेसाठी शुद्ध आचारविचारांची गरज असते!' असे विचार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी प्रीतम प्रकाश महाविद्यालय, इंद्रायणीनगर, भोसरी येथे मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी व्यक्त केले. पाली - मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान, पिंपरी आयोजित वार्षिक शब्दोत्सव उपक्रमांतर्गत जीवनगौरव व अन्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. टाटा मोटर्सचे सेवानिवृत्त महाव्यवस्थापक मनोहर पारळकर, नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी अध्यक्ष कृषिभूषण सुदाम भोरे, प्राचार्य सदाशिव कांबळे, लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रीतम प्रकाश महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव सन्मान प्रदान करून गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र, मानवस्त्र, पुष्पगुच्छ आणि 'समग्र बाबा भारती' हा ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरूप होते. त्याचबरोबर ज्येष्ठ पत्रकार पीतांबर लोहार (लोकशिक्षक बाबा भारती पारदर्शक पत्रकारिता पुरस्कार), संविधान अभ्यासक आर. जी. गायकवाड (लोकशिक्षक बाबा भारती धम्मभूषण पुरस्कार), निवेदक प्रा. दिगंबर ढोकले (लोकशिक्षक बाबा भारती शब्दप्रतिभा पुरस्कार), कवयित्री सीमा गांधी आणि प्रतिमा काळे (लोकशिक्षक बाबा भारती काव्यप्रतिभा पुरस्कार) प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, 'चांगुलपणाची बेरीज म्हणजे भारतीय संस्कृती आहे; तर स्वातंत्र्योत्तर संविधान संस्कृतीच्या सक्षमीकरणासाठी जात आणि धर्माच्या पलीकडे जाऊन कार्य केले पाहिजे. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान असे सामाजिक अभिसरणाचे काम करते आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. बौद्ध विचारांचा भारत आणि भारताबाहेर प्रचार अन् प्रसार करताना बाबा भारती यांनी बहुसांस्कृतिक भूमिका स्वीकारली होती!' मनोहर पारळकर यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.